**प्रशासक यांजकडून**

**कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर**

संदर्भ :- (१) मा. राज्य सेवा हक्क आयोग, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय यांचेकडील क्रमांक बैठक-२०२३ /प्र.क्र.१३८/मुसेहआ/कक्ष-२, दिनांक १४ डिसेंबर २०२३ चे पत्र.

(२) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचा शासन निर्णय क्रमांक एससीओ-२०१५/प्र.क्र. १८९/नवि-१४, दिनांक २३ जून २०१५.

(३) दिनांक २४ एप्रिल २०१८ चे राजपत्र.

*महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५, कलम ३ अन्वये.*

**जाहीर सूचना**

क्रमांक रवका/वशि-१/१८३९/२०२४.—शासन निर्णयान्वये कळविलेनुसार राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता, तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५, दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी लागू करण्यात आला आहे.

त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने यापूर्वी दिनांक १० मे २०१८ रोजी, पृष्ठ क्रमांक ५५ ते ५९ वर ३८ लोकसेवांचे महाराष्ट्र शासन राजपत्र प्रसिद्ध करणेत आलेले आहे.

आता, कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने संदर्भित शासन निर्णयातील तरतुदीनुसार लोकसेवा देण्यासाठी महानगरपालिकास्तरावर प्रसिद्ध करावयाच्या सुधारित ५२ सेवा निश्चित करण्यात आलेल्या असून त्यांचे दर / फी, तसेच त्यांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि विहित कालमर्यादा अधिसूचित करणेबाबत कार्यवाही करण्यात येत असून त्याची तपशीलवार माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये या पत्रासोबत जोडलेली आहे. यापूर्वी संदर्भ क्रमांक ३ प्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या ३८ सेवांमध्ये दुरुस्ती करून नव्याने प्रसिद्ध करावयाचा एकूण ५२ सेवांचा तपशील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेला आहे.

**परिशिष्ट - 'अ'**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५

कलम ३ अन्वये कोल्हापूर महानगरपालिकेने जाहीर करावयाच्या लोकसेवांचा तपशील

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | नव्याने कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड. ३. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र किंवा बांधकाम पूर्णत्व दाखला किंवा मंजूर नकाशा. | रुपये ५ | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| २ | पुन: कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड. ३. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र किंवा बांधकाम पूर्णत्व दाखला किंवा मंजूर नकाशा. | निशुल्क | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कराची मागणी पत्र तयार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | विनामूल्य | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ४ | करमाफी मिळणेबाबत | (१) माजी सैनिक -- १. विहित नमुन्यातील अर्ज, २. सैनिक कल्याण कार्यालय यांचे मूळ प्रमाणपत्र. ३. दरवर्षी आर्थिक वर्ष चालू होणेपूर्वी हयातीचा दाखला. (२) शैक्षणिक संस्था -- १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासकीय रजिस्ट्रेशन नोंद कागदपत्रे. (३) रेनवॉटर हार्वेस्टिंग -- १. विहित नमुन्यातील अर्ज, २. नगर रचना विभागाकडील नोंद प्रमाणपत्र. (४) सौरऊर्जा आणि इतर अपारंपरिक ऊर्जास्रोत वापर असलेस -- १. विहित नमुन्यातील अर्ज, २. महावितरण विभागाकडील वीज वापरात सौरऊर्जेचा वापर करत असलेबाबतचे प्रमाणपत्र. (५) ई-चार्जिंग स्टेशन -- १. विहित नमुन्यातील अर्ज, २. ई-चार्जिंग स्टेशन उभे करण्याचे परवानगी पत्र, तसेच आपण स्वत: वापर करून इतरांनाही त्याचा लाभ दिलेस सवलत लागू आहे. | विनामूल्य | ७ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. चालू आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती. | विनामूल्य | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | मालमत्ता कर उतारा देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. चालू आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती. | प्रति प्रत रुपये ६० | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ७ | (अ) दस्ताऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. चालू आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती. ३. ३ महिन्यांचे आतील ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड सोसायटीचा दाखला किंवा इंडेक्स-२ किंवा दस्तांची छायांकित प्रत | रुपये ७०० | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| | (ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. चालू आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती. ३. ३ महिन्यांचे आतील ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड. | | | | | |
| ८ | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. आक्षेपाच्या संदर्भाने असणारी आवश्यक पुराव्याची कागदपत्रे. | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ९ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. चालू आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती. ३. मिळकतधारकांची स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड किंवा ७/१२ उतारा त्यामध्ये मिळकती हिश्श्यांची नोंद. | रुपये ७०० | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| १० | मालमत्ता पाडणे व पुनर्बांधणी. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. मागील आर्थिक वर्षातील संपूर्ण घरफाळा भरल्याची पावती व नगर रचना विभागाकडील प्रारंभ प्रमाणपत्र. | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | नवीन नळजोडणी | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. मालकी हक्काची कागदपत्रे.<br>३. थकबाकी नसलेचा दाखला. | • फॉर्म फी रुपये २००<br>• १/२ इंची नळ कनेक्शन घरगुती रुपये २,५००, व्यापारी रुपये ३,७००, औद्योगिक रुपये ५,६००.<br>• ३/४ इंची नळ कनेक्शन घरगुती रुपये ४,६००, व्यापारी रुपये ४,८००, औद्योगिक रुपये ६,७००.<br>• १ इंची नळ कनेक्शन घरगुती रुपये ९,४००, व्यापारी रुपये ११,८००, औद्योगिक रुपये १८,४००.<br>• १½ इंची नळ कनेक्शन घरगुती रुपये १५,६००, व्यापारी रुपये १८,६००, औद्योगिक रुपये २५,६००.<br>• २ इंची नळ कनेक्शन घरगुती रुपये २३,०००, व्यापारी रुपये २७,०००, औद्योगिक रुपये ४०,५००. | १५ दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| १२ | नळ कनेक्शन मालकी हक्कात बदल. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. मालकी हक्काची कागदपत्रे.<br>३. थकबाकी नसलेचा दाखला. | १/२ इंची नळ कनेक्शनसाठी खरेदी पत्राने रुपये १,१०० वारसा हक्काने रुपये २०० कनेक्शनच्या साईजप्रमाणे सुपरव्हिजन फीमध्ये वाढ होईल. | ७ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| १३ | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | १/२ इंचीकरिता शुल्क रुपये १००.<br>३/४ इंचीकरिता शुल्क रुपये २००.<br>१ इंचीकरिता शुल्क रुपये ४००. | १५ दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| १४ | तात्पुरते / कायमस्वरूपी नळजोडणी खंडित करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>पाणी बिल, मीटर फोटो. | फॉर्म फी रुपये १०<br>शुल्क --<br>१५ मी.मी. करिता रुपये २००,<br>२० मी.मी. करिता रुपये ३००,<br>२५ मी.मी. करिता रुपये ७००,<br>४० मी.मी. करिता रुपये १४००,<br>५० मी.मी. करिता रुपये २३०० तेथून पुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | ७ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | पुनर्जोडणी | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. थकबाकी नसलेचा दाखला | फॉर्म फी रुपये १० शुल्क -- १५ मी.मी. व्यासासाठी शुल्क रुपये ४००, २० मी.मी. व्यासासाठी शुल्क रुपये ६५०, २५ मी.मी. व्यासासाठी शुल्क रुपये १३००, ४० मी.मी. व्यासासाठी शुल्क रुपये २२५०, ५० मी.मी. व्यासासाठी शुल्क रु. ३४०० तेथून पुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | १५ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| १६ | वापरामध्ये बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. थकबाकी नसलेचा दाखला. | निशुल्क | १५ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| १७ | पाणीदेयक तयार करणे. | विहित नमुन्यातील अर्ज. | रुपये ५ | ३ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| १८ | नवीन प्लंबर परवाना नोंदणी. | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. शैक्षणिक अर्हते-बाबतची प्रमाणपत्रे. ३. अनुभवाचा दाखला. ४. इतर अनुषंगिक कागदपत्रे. | नळ कारागीर -- अनामत रक्कम रुपये १५००, वार्षिक परवाना फी रुपये ६५०. ड्रेनेज कारागीर -- अनामत रक्कम रुपये १५००, वार्षिक परवाना फी रुपये ६५०. | ३० दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| १९ | प्लंबर परवाना नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. मागील नूतनीकरण फी भरलेली पावती. | नळ कारागीर वार्षिक नूतनीकरण फी रुपये ६५०. मासिक दंड रुपये १००. ड्रेनेज कारागीर नूतनीकरण फी रुपये ६५०, मासिक दंड रुपये १००. | ३० दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| २० | थकबाकी नसलेचा दाखला. | विहित नमुन्यातील अर्ज. | फॉर्म फी रुपये ५०, ग्राहकांसाठी शुल्क रुपये ७५. बिगर ग्राहकांसाठी शुल्क रुपये १५०. | ३ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| २१ | नादुरुस्त मीटर बदलणे | विहित नमुन्यातील अर्ज. | फॉर्म फी रुपये १०. १५ मी.मी. करिता शुल्क रुपये २००. २० मी.मी. करिता | ७ दिवस | पाणीपट्टी अधीक्षक | जल अभियंता | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शुल्क रुपये ३५०. २५ मी.मी. करिता शुल्क रुपये ६००. ४० मी.मी. करिता शुल्क रुपये ८५०. ५० मी.मी. करिता शुल्क रुपये ११०० तेथून पुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | | | | |
| २२ | अनधिकृत नळजोडणी तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज. | मा. महासभा ठराव क्र. ८, दि. २७ मे २०१३ चे धोरणानुसार दंडात्मक कारवाई करणे. | -- | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| २३ | पाण्याची दबावक्षमता तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज. | निशुल्क | ३ दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| २४ | पाण्याची गुणवत्ता तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज. | निशुल्क | ३ दिवस | शाखा अभियंता | उपजल अभियंता | जल अभियंता |
| २५ | व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | योग्यप्रकारे भरलेले अर्ज, प्रॉपर्टी कार्ड, गुमास्ता, जागेचा नकाशा, भोगवटा प्रमाणपत्र, जागा मालकाचे संमतिपत्र व घरफाळा पावती. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्रमांक २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | ७ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| २६ | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | १. मंडप उभारणीसाठी परवानगी अर्ज. २. इस्टेट विभाग अभिप्राय. ३. शहर वाहतूक नियंत्रण शाखेचा अभिप्राय. ४. संबंधित पोलीस ठाणेचा अभिप्राय. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. १६४, दि. २० फेब्रुवारी २०१० नुसार खड्डे फी व मा. महासभा ठराव क्र. ५३, दि. २८ फेब्रुवारी २०१७ प्रमाणे मंडप उभारणेचा दर निश्चित केलेला आहे, तसेच कार्यक्रमाचे स्वरूपानुसार अनामत रक्कम आकारणेत येते. | ७ दिवस | उपशहर अभियंता | प्रभाग क्षेत्र अधिकारी | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| २७ | नवीन परवाना मिळणे | योग्यप्रकारे भरलेले अर्ज प्रॉपर्टी कार्ड, गुमास्ता, जागेचा नकाशा, भोगवटा प्रमाणपत्र, जागा मालकाचे संमतिपत्र व घरफाळा पावती. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. क्रमांक २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'-- चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | परवान्याचे नूतनीकरण | नूतनीकरण अर्ज, परवाना प्रत. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. ५१, दि. २८ फेब्रुवारी २०१७. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| २९ | परवाना हस्तांतरण | मागणी अर्ज, परवाना-धारकाचे संमतिपत्र अगर मृत्यू दाखला व इतर वारसांचे संमतिपत्र. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३० | परवाना दुय्यम प्रत | मागणी अर्ज, जीर्ण प्रत, गुमास्तावरील नोंद. | निशुल्क | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३१ | व्यवसायाचे नाव बदलणे. | मागणी अर्ज, गुमास्ता-वरील नोंद. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३२ | व्यवसाय बदलणे | मागणी अर्ज, गुमास्ता-वरील नोंद. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३३ | परवाना / भागीदाराचे नाव बदलणे. | मागणी अर्ज, भागीदारी पत्र, व्यवसायधारकाचे संमतिपत्र, गुमास्ता. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३४ | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ / कमी). | मागणी अर्ज, भागीदारी पत्र, व्यवसायधारकाचे संमतिपत्र, गुमास्ता. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३५ | परवाना रद्द करणे | मागणी अर्ज, वीज कनेक्शन रद्द दाखला, गुमास्ता रद्द दाखला, जागेवरील पंचनामा. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९ नोव्हेंबर २०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३६ | कालवाह्य परवानासाठी नूतनीकरण सूचना. | थकबाकी नोटिस, परवाना नूतनीकरण करून सिस्टिमवर घेणे. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. ५१, दि. २८ फेब्रुवारी २०१७, १० टक्के लेट फीसह प्रतिवर्षी निश्चित केले जातात. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ३७ | भाग नकाशा | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड. | शुल्क रुपये ५०० | ३ दिवस | सहायक शहर रचनाकार. | उपशहर रचनाकार | सहायक संचालक नगर रचना. |

परिशिष्ट - 'अ'-- चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | झोन दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड. | शुल्क रुपये ५०० | ७ दिवस | सहायक शहर रचनाकार. | उपशहर रचनाकार | सहायक संचालक नगर रचना. |
| ३९ | जोते प्रमाणपत्र | १. बांधकाम परवाना प्रमाणपत्र.<br>२. लाईन आऊट प्रमाणपत्र,<br>३. लिखित अर्ज. | शुल्क रुपये २५०० | १५ दिवस | सहायक शहर रचनाकार. | उपशहर रचनाकार | सहायक संचालक नगर रचना. |
| ४० | बांधकाम परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. मालकी हक्क ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड.<br>३. प्रमाणित मोजणी नकाशा.<br>४. विकास योजना भाग नकाशा व झोन दाखला.<br>५. बांधकाम नकाशे.<br>६. वास्तुशिल्पी/अभियंते देखरेख प्रमाणपत्र. | रेडिरेकनर दराप्रमाणे प्रती चौ.मी. | ६० दिवस | सहायक शहर रचनाकार. | उपशहर रचनाकार | सहायक संचालक नगर रचना. |
| ४१ | भोगवटा प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. वास्तुशिल्पी परिपूर्ती प्रमाणपत्र.<br>३. प्रारंभ प्रमाणपत्रातील अटींची पूर्तता करणे.<br>४. सर्व्हेअरकडील लाईन आऊट व जोता चेकिंग घेतलेला दाखला. | कायद्यातील तरतुदीनुसार | ३० दिवस | सहायक शहर रचनाकार. | उपशहर रचनाकार | सहायक संचालक नगर रचना. |
| ४२ | १. विवाह नोंदणी प्रमाणपत्र.<br>२. वधू-वर सूचक मंडळांना प्रमाणपत्र देणे. | वर व वधू यांचे प्रत्येकी<br>१. रेशन कार्ड/पासपोर्ट/ मतदान ओळखपत्र.<br>२. जन्म दाखला/शाळा सोडलेचा दाखला/ एस.एस.सी. प्रमाणपत्र/ बोनाफाईड.<br>३. आधार कार्ड वधूसाठी माहेरकडील.<br>४. साक्षीदार तीन (प्रत्येकी आधार कार्ड).<br>५. आयडेंटी साईज फोटो (सर्वांचे).<br>६. लग्नपत्रिका ओरिजिनल. पत्रिका नसल्यास १०० रुपये स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र. | १. ९० दिवसांपर्यंत रुपये ५००.<br>२. १ वर्षापर्यंत रुपये ६००.<br>३. १ वर्षानंतर रुपये ७५०. | ३६ दिवस | आरोग्याधिकारी | निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तरीय), पुणे तथा संचालक (२), आरोग्य सेवा, पुणे. | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई. |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७. वधू-वर घटस्फोटित असल्यास कोर्ट आदेश आवश्यक.<br>८. विवाह प्रसंगाचा फोटो.<br>९. पुरोहित यांचे आधार कार्ड व 'ड' फॉर्मवरती स्वाक्षरी आवश्यक.<br>१०. रुपये १०० चे कोर्ट फी स्टॅम्प तिकीट.<br>११. सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रतीसह. | | | | | |
| ४३ | जन्म नोंदणी प्रमाणपत्र | विहित नमुन्यातील अर्ज. | १. जन्मानंतर २१ दिवसांच्या आत नोंद केल्यास प्रथम प्रत मोफत तद्नंतर रुपये ५० (अर्ज रुपये १० व प्रमाणपत्र रुपये ४०).<br>२. २१ दिवसांनंतर नोंदणी केल्यास नोंदणी फी व्यतिरिक्त (अर्ज रुपये १० व प्रमाणपत्र रुपये ४०). | ३ दिवस | आरोग्य अधिकारी | आरोग्य अधिकारी | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ४४ | मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र | विहित नमुन्यातील अर्ज. | १. मृत्यूनंतर २१ दिवसांच्या आत नोंद केल्यास प्रथम प्रत मोफत तद्नंतर रुपये ५० (अर्ज रुपये १० व प्रमाणपत्र रुपये ४०).<br>२. २१ दिवसांनंतर नोंदणी केल्यास नोंदणी फी व्यतिरिक्त (अर्ज रुपये १० व प्रमाणपत्र रुपये ४०). | ३ दिवस | आरोग्य अधिकारी | आरोग्य अधिकारी | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ४५ | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज.<br>३. आग प्रतिबंधक उपाय योजनांची रूपरेषा.<br>४. बांधकाम नकाशे. | रुपये १,५४० | ७ दिवस | स्थानक अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ४६ | अग्निशमन विभागाचा प्रस्तावित नवीन/ सुधारित इमारतीसाठी अभिप्राय देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज.<br>३. बांधकाम नकाशे. | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना २०२३ (सुधारणा) व प्रशासकीय दफ्तरी ठराव क्रमांक ४०, दि. १७ फेब्रुवारी २०२१ ने लागू असलेली फी. | १५ दिवस | स्थानक अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |

परिशिष्ट - 'अ'--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४७ | अग्निशमन अंतिम ना-हरकत देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. थकबाकी नसल्याचा दाखला. ३. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज. ४. फायर लायसन्स एजन्सीचे नमुना-अ प्रमाणपत्र. ५. विकसक/सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र. ६. अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र ७. अग्निशमन सेवा शुल्क भरल्याची पावती. | निशुल्क | १५ दिवस | स्थानक अधिकारी | मुख्य अग्निशमन अधिकारी. | विभागाचे नियंत्रण अधिकारी. |
| ४८ | मोबाईल टॉवर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना. ३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा. ४. वैध भाडेकरारनामा. ५. स्थळाचा नकाशा (१:१०००). ६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र. ७. संबंधित इमारतीच्या/ जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र. ८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत दाखला. ९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र. १०. पर्यावरण विभागाची ना-हरकत. ११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र. १२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/ दस्तऐवज. | शासनाने विहित केलेले व महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर. | ६० दिवस | सहायक नगर रचनाकार. | नगर रचनाकार | सहायक संचालक/ उपसंचालक नगर रचना/कार्यकारी अभियंता/शहर अभियंता. |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | रस्ता खोदाई परवानगी देणे, नवीन परवाना व नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | उपशहर अभियंता/शहर अभियंता. | विभागाचे नियंत्रण अधिकारी | आयुक्त |
| ५० | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्रा-करिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र.<br>३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र.<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| ५१ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदींनुसार वृक्षतोड परवानगी देणे. | महाराष्ट्र राज्य राजपत्रात असाधारण भाग एक-अ-मध्य उपविभाग, १४ डिसेंबर २००९/ अग्रहायण २३, शके १९३१ नुसार अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.<br>१. जागेची मालकी हक्कासंबंधीची कागदपत्रे.<br>२. मंजूर बांधकाम नकाशा असल्यास.<br>३. कलम ११(२) हमीपत्र.<br>४. तोडावयाच्या वृक्षांचे फोटो.<br>५. चालू वर्षाची चावी व घरफाळा भरलेली पावतीची छायांकित प्रत. | विनाशुल्क | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी. | संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी/आयुक्त, तसेच संबंधित विशेष नियोजन प्राधिकरणाचे/ क्षेत्र विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापकीय संचालक. | संबंधित नियोजन प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण. |
| ५२ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदींनुसार | महाराष्ट्र राज्य राजपत्र असाधारण भाग-एक-अ-मध्य उपविभाग, १४ डिसेंबर २००९/ अग्रहायण २३, शके | विनाशुल्क | ४५ दिवस | संचालक पर्यावरण व वातावरणीय बदल तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण. | महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्यास संबंधित वृक्ष प्राधिकरण | -- |

परिशिष्ट - 'अ'-- *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशे-पेक्षा अधिक झाडे. तसेच पुरातन (हेरिटेज) वृक्ष पाडण्यासाठी परवानगी देणे. | १९३१ नुसार अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे. १. जागेची मालकी हक्कासंबंधी कागदपत्रे. २. मंजूर बांधकाम नकाशा असल्यास. ३. कलम ११(२) हमीपत्र. ४. तोडावयाच्या वृक्षांचे फोटो. ५. चालू वर्षाची चावी व घरफाळा भरलेली पावतीची छायांकित प्रत. | | | | पंधरा दिवसांच्या कालावधीच्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला विनंती करू शकेल. | -- |

के. मंजुलक्ष्मी,
प्रशासक,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.

कोल्हापूर, १७ जानेवारी २०२४.

---

## मुख्याधिकारी तथा प्रशासक यांजकडून

## सातारा नगरपरिषद, सातारा

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये सातारा शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण*

## जाहीर सूचना

क्रमांक सानप/शवि/१४९०/२०२४.— ज्याअर्थी, सातारा नगर परिषद (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखिलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली), चे कलम २१ *(२)*, २३ *(१)* सह कलम ३४ व ३८ मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखिलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. १६, दिनांक ३ सप्टेंबर २०२१ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना दिनांक ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून सातारा नगरपरिषद उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश क्रमांक १८७३, दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ रोजीचे पत्र क्रमांक वि.यो.सातारा/वियोविघसा/०३, गोपनीय अन्वये, उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरित केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी प्रशासकीय आदेश क्रमांक ५३, दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये नागरिकांकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

(१) मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा.